# "राजर्षी शाहू महाराज जयंती कार्यक्रम"

## अहवाल

दिनांक 26 जून 2025 रोजी महाविद्यालयामध्ये राजर्षी शाहू महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या विशेष कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या नालंदा कुलातर्फे मा. प्रा. बिजली दडपे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या अध्यक्षस्थानी पार पाडण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात ओंकार घेवून झाली. त्यानंतर मा. प्राचार्य व प्राध्यापक वृंद यांच्या उपस्थितीत राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमात सुविचार, पंचांग व दिनविशेष यांचे सादरीकरण करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्या दिवशीच्या विशेषतेचे महत्त्व समजून घेता आले.

यानंतर श्रीमती स्मितल कुरूप यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनावर आधारित सामान्यज्ञान विविध प्रश्न सादर केले, ज्यामध्ये विद्यार्थ्यांचा चांगला सहभाग होता. तसेच श्रीमती तनुश्री आठवले यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवन कार्यावर अभ्यासपूर्ण भाषण केले. त्यांनी शाहू महाराजांचे सामाजिक सुधारणा कार्य, शिक्षणावरील भर आणि बहुजन समाजासाठी केलेले कार्य प्रभावीपणे मांडले.


कार्यक्रमाच्या शेवटी माननीय प्रा. बिजली दडपे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी शाहू महाराजांच्या विचारांचा आजच्या काळातील उपयुक्ततेवर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या माननीय प्राचार्य डॉ. रमा भोसले या होत्या.

कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन श्री. निमिष जाधव यांनी केले.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला आणि शाहू महाराजांच्या विचारांची पुन:प्रचिती होण्यास कारणीभूत ठरला.

# राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त कार्यक्रमाची क्षणचित्रे (२०२५)




राजर्षी शाहू महाराज जयंती कार्यक्रमानिमित्त उपस्थित प्रथम वर्ष छात्रध्यापक




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना श्री. निमिष जाधव




राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त प्रतिमा पूजन करताना मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले




राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त आपले मनोगत व्यक्त करताना मा. प्रा. बिजली दडपे




शाहू महाराजांच्या कार्यावर आपले विचार व्यक्त करताना श्रीमती तनुश्री आठवले




शाहू महाराजांच्या कार्यावर आधारित सामान्य ज्ञानाचे प्रश्न विचारताना श्रीमती स्मितल कुरूप